**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उप-विभागीय अधिकारी, व उप-विभागीय दंडाधिकारी**
**कार्यालय, महाड विभाग, महाड**
*Sub Divisional officer & Sub Divisional Magistrate office, Mahad Division, Mahad*
**एस. टी. स्टँड जवळ महाड, ता. महाड, जि. रायगड**
दूरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२१४५-२२२१३६ email : sdomahad१@gmail.com

---

जा.नं.प्रशासन/कात.५/स्वच्छता अभियान/२०१२ दिनांक :- २७/०२/२०१२

प्रति,

श्री. व्हीकेएस बेडेकर,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
मिलेनियम प्रापर्टीज लिमिटेड,
पुणे - ४११ ०५२

विषय:- शिवजयंतीनिमित्त किल्ले रायगडावर स्वच्छता मोहीम राबविलीबाबत.

दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजी शिवजयंतीचे औचित्य साधून महाड महसूल विभाग आणि सामाजिक संस्था तसेच आपल्याकडील कर्मचाऱ्यांनी किल्ले रायगडावर स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोहिमेस रायगड रोपवे येथील कर्मचाऱ्यांनी फार मोठे योगदान दिले होते.

सौ.वैशाली राजेंद्र जोग, एम.डी. मिलेनियम प्रापर्टीज लिमिटेड यांचेमार्फत गडावर येणाऱ्या पर्यटकांकडून सर्वत्र पाण्याच्या बाटल्या, वेफर्स, बिस्कीट आदींची कागदे यामुळे गडाच्या पावित्र्याला बाधा येत असल्याने, आपल्याकडून दिनांक २१ जानेवारी २०१२ रोजी पुढाकार घेऊन रायगड किल्ल्यावर स्वच्छता सप्ताहाचे आयोजन केले होते. त्यावेळी सुमारे ७५०० पेक्षा जास्त बाटल्या जमा करुन रायगड किल्ल्याचे पावित्र जपले असून, एक प्रकारे शासनास मोलाचे सहकार्य केले आहे. याचवेळी पर्यटकांना आपल्याकडून घेतलेली पाण्याची बाटली आपणास परत केल्यास ४/- रुपये व इतर बाटल्या परत केल्यास २/- देण्याची जी मोहिम सुरु केलेली आहे ती अतिशय चांगली असून, कौतुकास्पद आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बाटलीमागे १ रुपया व ग्रामस्थांकरीता ५० पैसे प्रती बाटली रक्कम देण्याची देखील मोहिम आपण सुरु केलेली आहे. त्यामुळे रायगड किल्ल्याचे घनकचऱ्यापासून पावित्र जपले जाण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रशासनाकडून आपणास विनंती करणेत येते की, सदरची योजना आपण तात्पुरत्या स्वरुपात न राबविता ती कायम स्वरुपी राबवावी जेणेकरुन रायगड किल्ला प्लॅस्टिक मुक्त राखण्यास फार मोलाची मदत होईल.

शिवजयंतीनिमित्त स्वच्छता मोहिमेचा कार्यक्रम राबविण्यासाठी महसूल विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आपल्यामार्फत मोफत रोपवेची सुविधा दिली होती त्याबद्दल तसचे आपल्याकडून राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेबाबत महसूल विभागातर्फे मी आपले धन्यवाद मानीत आहे.

**उपविभागीय अधिकारी**
**महाड विभाग, महाड**